कर आकारणी कर संकलन कार्यालय,
पुणे महानगरपालिका
दिनांक - २३/०२/२०२६

## <u>प्रेस नोट</u>

## "पुणे महानगरपालिका कार्यक्षेत्रातील अभय योजनेस दि. १५ मार्च २०२६ पर्यंत"

पुणे महानगरपालिका, कर आकारणी व कर संकलन विभागामार्फत "अभय योजना" जाहिर करणेत आली आहे. सदर योजने अंतर्गत थकीत कराचे व्याजाच्या रक्कमेवर ७५% सवलत देण्यात येत आहे. अभय योजना प्रथम दि. १५ नोव्हेंबर २०२५ ते १५ जानेवारी २०२६ रोजी पर्यंत राबविण्यात आली होती. तदनंतर दि. १६ जानेवारी २०२६ ते १५ फेब्रुवारी २०२६ या कालावधीसाठी योजनेस मुदतवाढ देण्यात आली आहे.

मा. सदस्यांच्या व नागरिकांच्या मागणीनुसार उक्त अभय योजनेस दि. १५ मार्च २०२६ पर्यंत मुदत वाढ देण्यात येत आहे.

सर्व मिळकतकर थकबाकीदार यांनी सदर मुदत वाढीचा लाभ घेऊन स्वयंस्फूर्तीने थकीत कर भरून महानगरपालिकेस सहकार्य करावे, असे आवाहन प्रशासनाकडून करण्यात येत आहे.

(रवि पवार)
उप आयुक्त तथा
कर आकारणी व कर संकलन प्रमुख,
पुणे महानगरपालिका